नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/01/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## अवैधरीत्या दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीला अटक

## पोलीस स्टेशन नरखेड ची कार्यवाही

पो.स्टे. नरखेड :– पोलीस स्टेशन नरखेड येथे अवैध धंदे बाबत विशेष मोहीम राबवून विशेष पथक तयार करून मोहीमे अंतर्गत दिनांक २५/०१/२०२३ चे १७.०० वा. दरम्यान मौजा ओम नारायण सभागृहाचे समोर नरखेड येथे होंडा ॲक्टीवा क्र. एम. एच.४०/सीई–७८२९ चा चालक आरोपी नामे– दिनेश किसनाजी सोमकुवर, वय ४१ वर्ष, रा. वार्ड नं. १७ नरखेड हा गाडी मध्ये एका खोक्यामध्ये ओ. सी. ब्ल्यु च्या ४८ निपा इंग्लीश दारू बॅच क्र. ५९९ दि. २२/१२/२०२२ असे प्रत्येकी १८० एम. एल क्षमतेच्या व दुसऱ्या खोक्यामध्ये बि–७ च्या ४८ निपा इंग्लीश दारू बॅच क्र. ६०८ दि. २२/१२/२०२२ लेबल असलेली प्रत्येकी १८० एम. एल. क्षमतेच्या वाहतूक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून असा एकुण वाहनासह ८५८४०/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई ब. न. ९९९ जगदीश उईके यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ६५(ई)(अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. न. २०८६ संतोष क्षिरसागर मो. नं. ८८८८८०५४७८ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात पो.स्टे. नरखेड येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक जयपालसिंह गिरासे यांचे मार्गदर्शनाने पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले, पोलीस नायक कैलास उईके, संतोष क्षिरसागर, पोलीस शिपाई सुरज मोहेकर, गौरव बखाल, जगदीश उइके यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर